# महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ

मध्यवर्ती कार्यालय, महाराष्ट्र वाहतूक भवन, डॉ.आनंदराव नायर मार्ग, मुंबई - ४०० ००८
दूरध्वनी -२३०२३९००/ २३०७५५३९ Website : www.msrtc.gov.in फॅक्स - २३०८६३५२

## प्रसिध्दी पत्रक क्र. १६

## - बोरीवली - शिर्डी मार्गावर एस. टी. ची वातानुकूलित व्होल्वो शिवनेरी सेवा -

**मुंबई, बुधवार, दि. ३१ मार्च, २०१०**

मुंबईच्या पश्चिम उपनगरातील प्रवाशांच्या सोयीसाठी रा. प. महामंडळाने आजपासून बोरीवली - शिर्डी मार्गावर दोन नविन वातानुकूलित - शिवनेरी बसेस सुरु केल्या आहेत.

बोरीवली (सुकुरवाडी / नॅन्सी कॉलनी ) येथून रात्रौ ०८.३० व ९.३० वा. सुटणा-या या बसेस ठाणे मध्यवर्ती बसस्थानक - नाशिक (महामार्ग) मार्गे शिर्डी येथे दुस-या दिवशी सकाळी अनुक्रमे २.३० व ३.३० वा पोहोचतील. परतीच्या प्रवासासाठी शिर्डीहून ११.३० व १२.३० वा. सुटणा-या बसेस त्याच दिवशी सायंकाळी अनुक्रमे ५.३० व ६.३० वा. बोरीवली येथे पोहोचतील.

या सेवेचे प्रवासभाडे पुढीलप्रमाणे आहे :-

| | प्रौढ | मुले |
|---|---|---|
| बोरीवली - शिर्डी | रु. ४३५/- | रु. २१८/- |
| बोरीवली - नाशिक | रु. २८७/- | रु. १४४/- |
| ठाणे - शिर्डी | रु. ३९८/- | रु. १९९/- |
| ठाणे - नाशिक | रु. २५०/- | रु. १२५/- |
| नाशिक - शिर्डी | रु. १४८/- | रु. ७४/- |

उपरोक्त बसेसचे संगणकीय आरक्षण उपलब्ध करण्यांत आले आहे. श्री साईबाबांचे दर्शन घेऊन त्वरीत परतणा-या भाविकांना या सेवेचा चांगला फायदा होणार असून त्याचा सर्वांनी लाभ घ्यावा असे आवाहन रा. प. महामंडळातर्फे करण्यांत येत आहे.

**सहा. जनसंपर्क अधिकारी**

**PRESS NOTE No 16**

**MSRTC starts Borivali-Shirdi A/C Volvo Service**

Mumbai, March 31, 2010

Maharashtra State Road Transport Corporation (MSRTC) has introduced two air-conditioned Volvo –Shivneri services on Borivali-Shirdi route. The buses have started plying from today. The buses leave from Borivali (Sukurwadi/Nancy Colony) at 20.30 hrs, 21.30 hrs and reach next day at Shirdi via Thane CBS – Nashik (Mahamarg) at 2.30 and 3.30 hrs respectively. Similarly, the buses leaving from Shirdi at 11.30, 12.30 hrs will reach Borivali on the same day at 17.30, 18.30 hrs respectively.

The fare of these services is as follows :

| | Adult | Child |
|---|---|---|
| Borivali – Shirdi | Rs 435/- | Rs 218/- |
| Borivali – Nashik | Rs 287/- | Rs 144/- |
| Thane – Shirdi | Rs 398/- | Rs 199/- |
| Thane – Nashik | Rs 250/- | Rs 125/- |
| Nashik – Shirdi | Rs 148/-` | Rs 74/- |

With this air-conditioned service, the long standing demand of the devotees from Western Suburbs of Mumbai has been fulfilled. MSRTC Vice Chairman & Managing Director Mr Deepak Kapoor has urged citizens to utilize and take benefit of this service.

**Asst Public Relations Officer**